IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# आदिवासी क्षेत्रातील शिक्षण योजनांचा सामाजिक बदलावर परिणाम

किरण कैलास कोकणे

संशोधन विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**सारांश :**

आदिवासी हा भारत देशाचा सामाजिक संरचनेचा एक महत्वाचा भाग आहे. आदिवासी समाजाचे शिक्षण क्षेत्रातील मागासलेपण लक्षात घेता त्यांना वेगवेगळ्या योजना उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षणाने माणूस विकसीत होतो व त्याच्यात सामाजिक परिवर्तन घडून येते. त्यामुळे केंद्र सरकार व राज्य शासन यांच्या द्वारे आदिवासी समाजात परिवर्तन घडून येण्यासाठी तसेच ते स्वलंबी व साक्षर होण्यास मदत मिळावी आणि सूशिक्षित व्हावे यासाठी विविध शिक्षण योजना व विविध जनजागृती अभियान यांची अंमलबजावणी केली आहे. या शिक्षण योजनांचा आदिवासी समाजावर काय व कोणते परिणाम दिसून आले याचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. या संशोधनाचा उद्देश आदिवासी समाजावर या योजनामुळे झालेले त्यांचे सामाजिक परिवर्तन, सक्षमीकरण, सुधारलेली आर्थिक स्थिती आणि जागरूकता यासगळ्यांवर काय परिणाम झाला याचा अभ्यास करणे हा आहे.

या अभ्यासातून असे दिसून आले की या योजनांमुळे त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आले आहेत. महत्वाचे म्हणजे मुलींच्या शिक्षणामध्ये लक्षणीय वाढ दिसून आली आहे. शिक्षणामुळे येणारी आर्थिक अडचण खूप मोठ्या प्रमाणात कमी झाल्या आहेत. परंतु अजूनही आदिवासी क्षेत्रात काही सुविधांचा अभाव दिसून येत आहे. ह्या शिक्षण क्षेत्रातील आव्हानांना संपूष्टात आणण्यासाठी शासन विविध उपक्रम आदिवासी भागात राबावत आहे. या योजनांची प्रभावीपने अंमलबजावणी आणि स्थानिक गरजांची योग्य प्रकारे पूर्तता केली तर आदिवासी समाजाचा सर्वसमावेशक विकासाचा समतोल साधता येईल.

**सूचीशब्द :** आदिवासी क्षेत्रातील शिक्षण, शिक्षण योजना, सामाजिक परिवर्तन, शिक्षणातील आव्हाने, शिक्षणामुळे घडणारे बदल, ग्रामीण शिक्षण इत्यादी.

**प्रस्तावना :**

भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे, विविध जाती–धर्माचे लोक हे या देशात वास्तवास आहेत. त्यापैकी या देशाचा मूळनिवासी समजला जाणाऱा आदिवासी समाज हा या देशाचा एक महत्वाचा घटक आहे. भारतात अनुसूचित जमातीची लोकसंख्या ही सुमारे एकूण लोकसंख्येच्या ८.६% आहे. महाराष्ट्रातील आदिवासी समाज हा प्रामुख्याने डोंगराळ भागात राहत आहे. महाराष्ट्रातील नाशिक, नंदुरबार, ठाणे, पालघर, गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज आढळून येतो. आदिवासी समाज हा त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक परंपरेमुळे ओळखला जातो. त्यांच्या असलेल्या वेगळया परंपरा, चाली–रूढी यांच्यामुळे त्यांचे इतरांपेक्षा वेगळेपण दिसून येते. परंतु त्यांचा इतिहास पहिला तर आदिवासी समाज हा पूर्वीपासूनच शिक्षणाच्या बाबतीत मागे राहीला आहे. आदिवासी समाजाचे भौगोलिकदृष्ट्या असलेले राहणीमान, अनेक आर्थिक अडचणी, त्यांच्या भाषेची असेलेली तपावत आणि सामाजिक परिस्थिती या कारणांमुळे शिक्षणाच्या बाबतीत त्यांना अडथळे निर्माण झाले आहेत. आदिवासी क्षेत्राचा अभ्यासाच्या दृष्टीने विचार करता सर्वात महत्वाचे त्यांचे मागासलेपण व अशिक्षितपणा यांचा सर्वात प्रथम विचार केला जातो. आदिवासी समाजाचे मागासलेपण हे त्यांच्या अशिक्षित राहिल्याकारणामुळे आहे असे मानले जाते.

शिक्षणामुळे आदिवासी समाजाचे सामाजिक जीवनात सुधार येईल व त्यांचे सामाजिक परिवर्तन बदलेल या दृष्टीने केंद्र शासन व राज्य शासन यांनी अनेक शिक्षण योजना राबविल्या आहेत. आदिवासी समाजाला प्रामुख्याने शिक्षणात अनेक आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्येचा देखील शासनाने दखल घेऊन शिष्यवृत्ती योजना चालू केली आहे. तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे पूर्णपणे मोफत केले आहे. अशाच अनेक प्रकारच्या विविध योजना सरकारने राबविल्या आहेत. या संशोधनाचा प्रमुख मुद्दा हाच आहे की आदिवासी क्षेत्रामध्ये शासन ज्या शिक्षण योजना राबवत आहेत त्या योजनांचा आदिवासी समाजावर कोणते सामाजिक परिणाम झाले आहेत याचा अभ्यास करणे हा आहे.

**संशोधनाची उद्दिष्ये :**

1) आदिवासी क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या प्रमुख शिक्षण योजनांचा अभ्यास करणे.
2) आदिवासी समाजावर त्या शिक्षण योजनांचा झालेल्या सामाजिक परिणामांचे विश्लेषण करणे.
3) शिक्षणामुळे आदिवासी तरुण व महिलांमध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
4) आदिवासी क्षेत्रात शिक्षण योजनांची अंमलबजावणी करतानी येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

हे संशोधन पूर्ण करण्यासाठी दुय्यम माहितीच्या स्त्रोतांचा वापर केला आहे. या विषयाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. दुय्यम महितीचे स्त्रोत पुढील प्रमाणे आहेत.

- भारत सरकारचे आदिवासी मंत्रालायचे वार्षिक अहवाल
- महाराष्ट्र शासनाचे आदिवासी विकास विभागाचे अहवाल
- नीती आयोगाचे अहवाल, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थाचे अहवाल
- इंटरनेट, पुस्तके, प्रकाशित जर्नल्स, लेख इत्यादी.

- आदिवासी विकास विभागांच्या योजनांच्या माहिती पुस्तिका

**प्रमुख शिक्षण योजना :**

आदिवासी समाजाचा विकास घडवण्यासाठी शासनाने विविध योजना राबवेल्या आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आदिवासी क्षेत्रात स्वतंत्र अशी शाळा स्थापन केल्या आहेत. तसेच इतर अनेक योजना देखील राबविल्या आहेत त्या खालीलप्रमाणे :

1) आदिवासी आश्रमशाळा :

आदिवासी समाज अतिशय दुर्गम भगत राहत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शहराच्या ठिकाणी शिक्षणसाठी येण्यास अडचणी येतात त्यामुळे पालक त्यांच्या मूलांना शाळेत पाठवत नाहीत. आशा ठिकाणी येण्या–जाण्यास सोयीस्कर जागा आहे तिथे आश्रमशाळा बांधली गेली आहे. त्या शाळेत शिक्षण घेत असलेल्या मुलांना मोफत राहण्याची व्यवस्था, भोजन व्यवस्था, पाठ्यपुस्तके, शाळेचा व रात्रीचा गणवेश व इतर साहित्य दिले जाते. काही आश्रमशाळा या मराठी माध्यमातून सुरू आहेत तर काही आश्रमशाळा इंग्रजी माध्यमातून सुरू आहेत.

2) एकलव्य मॉडेल निवासी शाळा :

या योजनेंतर्गत आदिवासी मुलांना दर्जेदार शिक्षण दिले जाते. या शाळांमध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ ह्या राष्ट्रीय– स्तरीय मंडळातर्फे शिक्षण व परीक्षा नियंत्रित केल्या जातात. खासगी शाळांमध्ये या मंडळाची फी लाखों रुपये आहे, याच धर्तीवर आदिवासी मुलांना देखील हे शिक्षण मिळावे म्हणून ही योजना अत्यंत प्रभावी ठरली आहे.

3) उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती योजना :

पुढील शिक्षण घेण्यासाठी आदिवासी मुलांना ही योजना फायदेशीर ठरली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असणाऱ्या आदिवासी मुलांना शिक्षणाच्या खर्च पूर्णपणे शासन स्तरावरून दिल जाईल हे या योजनेचे उद्दिष्टये आहे. या मुळे आदिवासी मुलांचे पुढील शिक्षण घेण्यास खूप मदत होते.

4) शासकीय वसतिगृह :

विभागस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकस्तरीय व शहराच्या ठिकाणी आदिवासी मुला–मुलींना राहण्यासाठी स्वतंत्र शासकीय वसतिगृह स्थापन करण्यात आले आहेत. या वसतिगृहात राहण्याची, खाण्याची सुविधा व इतर उपयोगी साहित्य मोफत दिले जाते. ज्यामुळे गावातून शहरात येऊन शिक्षण घेण्याचे हाजारो आदिवासी मुला–मुलींचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

5) स्वयंम् DBT योजना :

शहरात येऊन शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहावे लागले किंवा तो ज्या महाविद्यालयात प्रवेशीत आहे त्या परिसरात वसतिगृह उपलब्ध नसेल अशा विद्यार्थ्यांना राहण्यासाठीचे व जेवणसाठीचे पैसे डायरेक्ट त्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित केले जातात. या योजनेमुळे मुलांना आर्थिक मदत होते.

6) RTE योजना :

Right to Education ( शिक्षणाचा अधिकार ) या योजनेंतर्गत सर्व मुलांना उत्तम व दर्जेदार प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत सर्व मुलांच्या प्रथम परीक्षा घेतली जाते त्यानंतर उत्तीर्ण मुलांची यादी प्रसारित केली जाते. शहराच्या उच्च

खाजगी शाळांमध्ये या मुलांना मोफत शिक्षण दिले जाते. यामध्ये राज्य शिक्षण मंडळ, केंद्र शिक्षण मंडळ (सीबीएसई) आणि भारतीय प्रमाणपत्र माध्यमिक शिक्षण मंडल (आयसीएसई) इत्यादी तर्फे शिक्षण दिले जाते. यामध्ये 25% जागा मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवल्या जातात.

तसेच, सरकारी-खासगी महाविद्यालाय, संस्था, विद्यापीठ यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राखीव जागा ठेवल्या जातात. जेणेकरून हे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही.

**आदिवासी क्षेत्रात भेडसावणाऱ्या शिक्षणतील समस्या :**

आदिवासी क्षेत्रात शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे यासाठी शासन जरी अनेक सरकारी योजना राबवत असले तरी प्रत्येक्षात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामध्ये काही गंभीर अडचणी आढळतात त्या खालीलप्रमाणे :

- आदिवासी क्षेत्र हे अतिशय दुर्गम भागात असल्यामुळे त्याठिकाणी शाळांची संख्या ही खूपच अल्प प्रमाणात आहे. त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांना खूप लांब प्रवास करून शाळेत जावे लागते. तसेच त्याठिकाणी प्रवासासाठी वाहनांची योग्य सोय देखील उपलब्ध नाही त्यामुळे विद्यार्थ्यांना पायी प्रवास करावा लागतो.
- आदिवासी भागात सर्वात मोठी समस्या म्हणजे त्याठिकाणी असलेली शिक्षकांची समस्या होय. दोन-तीन वर्ग मिळून एकच शिक्षक असतो किंवा सगळे विषय एकच शिक्षक शिकवत असतो. आदिवासी भागात वरिष्ठ अधिकारी शाळेची चौकशी करण्यासाठी येत नाहीत त्यामुळे शिक्षकांची अनुपस्थिती देखील मोठ्या प्रमाणात आढळते.
- या शाळांमध्ये शिकवत असलेल्या शिक्षकांमध्ये गुणवत्तेचा अभाव दिसून येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत योग्य ते शिक्षण पोहचत नाही व त्यांच्या शिक्षणावर याचा प्रभाव दिसून येतो.
- येथील सगळयात मोठी समस्या म्हणजे आदिवासी लोकांची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे ते त्यांच्या मुलाला पूर्ण शिक्षण देत नाहीत. त्यांना ते मजूरी करण्यासाठी बाहेर पाठवतात.
- आदिवासी पालक हे अशिक्षित असल्यामुळे त्यांच्यात शिक्षणाबद्दल जागरुकतेता अभाव दिसून येतो.
- विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतानी भाषा ही सर्वात महत्वाची अडचण येते. त्यांच्या घरात बोलली जाणारी त्यांची बोलीभाषा व शाळेत शिकवली जाणारी भाषा यांच्यात खूप अंतर असते.
- विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे म्हणून इंटरनेट आणि इतर डिजिटल साधनांचा उपयोग केला जातो. परंतु, आदिवासी भागात नेटवर्कची समस्या असल्यामुळे त्याचा मोठ्या प्रमाणात अभाव दिसून येतो.
- आदिवासी क्षेत्र हे डोंगर-जंगल या ठिकाणी असल्यामुळे तेथील मुलींना सुरक्षित शाळेत जाण्याची वाहतुकीचा अभाव दिसून येतो. तसेच मुलींना शाळेमध्ये योग्य अशा स्वच्छतागृहांचा अभाव दिसून येतो.
- आदिवासी विद्यार्थी खूप खेळांमध्ये प्राविण्य मिळवतात पण त्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळत नसल्यामुळे त्यांच्या मधील कौशल्य जगाला दिसत नाही. तसेच आदिवासी भागातील शाळेमध्ये स्वतंत्र खेळासाठी शिक्षक उपलब्ध नाहीत.

## आदिवासी क्षेत्रात शिक्षण योजनांमुळे झालेला सामाजिक बदल :

आदिवासी समाजाचा विकास साधता यावा म्हणून शासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. या योजनांमुळे आदिवासी समाजात कोणते सामाजिक बदल झाले ते खालीलप्रमाणे आहेत :

1) आदिवासी समाजात झालेली सामाजिक जागरुकतेत वाढ :

आदिवासी क्षेत्रात शिक्षण योजना राबविल्यामुळे त्यांना शिक्षणाची ओढ निर्माण झाली. शिक्षणामुळे त्यांच्यातील अंधश्रद्धा कमी झाली व त्यांना असलेली सामाजिक भीती देखील कमी झाली. आरोग्यविषयी, स्वच्छताविषयी, मतदान आणि त्यांच्या मूलभूत हक्कांविषयी जागरुकता निर्माण झाली आहे. सामाजिक भेदभाव न पाळता ते मुख्य प्रवाहात येऊ लागले आहेत.

2) महिलांचे सक्षमीकरण :

या योजनांमुळे मुलींच्या शिक्षणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ दिसून आली. त्यामुळे बालविवाह कमी होण्यास मदत झाली व मुलींच्या विवाहाचे वय वाढले. तसेच महिला मोठ्या पदावर अधिकारी म्हणून काम करू लागल्या आहेत. घरातील निर्णय महिला स्व:ता घेऊ लागल्या, त्यांचे समाजातील स्थान उचवले आहे.

3) रोजगार संधीचे वाढते प्रमाण :

शिक्षणामुळे आदिवासी तरुण–तरुणी शेती व इतरत्र मजुरी करण्या व्यतिरिक्त ते सरकारी नोकऱ्या करू लागले. तसेच खाजगी क्षेत्रात देखील ते उच्च पदावर काम करू लागले. छोटे–मोठे उद्योग–व्यवसाय देखील ते करू लागल्याचे दिसते.

4) सामाजिक स्थान उंचावले :

आदिवासी समाज हा दुर्गम भागातून शहरी भागात वास्तवास येत आहे. त्यांना इतर समाजात आदराने स्थान दिले जात आहे. परंतु, काही ठिकाणी त्यांना अजून पण त्यांच्या जातीवरून हिणवल्याचे प्रकार घडून येतात. शिक्षणामुळे त्यांच्या राहणीमानात खूप बद्दल घडून आला आहे.

5) आर्थिक प्रगती :

शिक्षणामुळे त्यांना रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले त्यामुळे त्यांची आर्थिक पातळी सुधारण्यास मदत झाली आहे. त्यांचे जीवनमान मोठ्या प्रमाणात उंचावले आहे. ते परदेशात देखील जाऊ लागेल आहेत.

6) संस्कृतीचे जतन करणे :

आदिवासी तरुण–तरुणी शिक्षणामुळे मुख्य प्रवाहात आल्यामुळे ते आधुनिक जैवण जगू लागले आहेत. परंतु, ते आपल्या परंपरा, संस्कृती यांचे जतन करून त्याचा वारसा पुढे घेऊन जात आहेत.

7) परदेशात शिक्षणसाठीचे वाढते प्रमाण :

आदिवासी विद्यार्थ्यांनी परदेशात जाऊन देखील शिक्षण घेतले पाहिजे त्यासाठी शासन योजना राबावत आहेत. त्यामुळे अनेक आदिवासी विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊन परदेशात शिक्षण घेण्याचे आपले स्वप्न पूर्ण करत आहेत. याचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे.

8) आदिवासी समाजाचे स्थानिक नेतृत्व :

शिक्षणामुळे तरुण–तरुणी समाजकारणाकडे येऊ लागले आहेत. आदिवासी समाजाच्या समस्या सरकारकडे मांडू लागले आहेत. आपले हक्क मिळवण्यासाठी एकत्र येऊन आंदोलने, मोर्चे काढतानी पण दिसतात. प्रत्येक आदिवासी क्षेत्रात स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये नेतृत्व तयार झाले आहे. शिक्षणामुळे आपले मूलभूत हक्कांवर प्रश्न विचारू लागले आहेत.

**नमूना निवड मर्यादा :**

हे संशोधन आदिवासी क्षेत्रातील शिक्षण योजनांचा सामाजिक बदलाचे परिणाम या विषयापुरतीच मर्यादित आहे. या संशोधनासाठी महाराष्ट्रातील बहुलआदिवासी क्षेत्रातून माहिती जमा केली आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालय (पदवी, पदव्युत्तर) यांच्या संबंधित योजनांचा अभ्यास केला आहे. हे संशोधन करण्यासाठी केवळ सरकारी योजनांची दखल घेतली गेली आहे, यामध्ये खासगी संस्थाच्या योजनांची दखल घेतली नाही. या संशोधनात सामाजिक बादलांचाच अभ्यास केला आहे. या संशोधनासाठी बहुतांश माहिती ही दुय्यम स्त्रोताद्वारे वापरलेली गेली आहे.

**निष्कर्ष :**

शिक्षण हे आदिवासी समाजाच्या विकासाचा मूलभूत पाया आहे. शासनाने राबविलेल्या सरकारी योजनांमुळे अनेक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बदल घडून येतानी दिसतात. या संशोधनातून काही निष्कर्ष दिसून आले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत.

1) या शिक्षण योजनांमुळे आदिवासी समाजात सकारात्मक बदल घडून आलेले दिसतात.
2) आदिवासी विद्यार्थ्यांची शाळेत येण्याची संख्या वाढली आहे व अनुपस्थितीत राहण्याची संख्या कमी झाली आहे.
3) आदिवासी मुलींच्या शिक्षणात खूप मोठ्या प्रमाणात वाढ झालेली बघायला मिळते.
4) आदिवासी समाजात शिक्षणाच्या बाबतीत जागरूकता झालेली आढळते.
5) आदिवासी क्षेत्रात आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली दिसते.

**उपाययोजना :**

आदिवासी समाजाचा विकास घडवण्यसाठी सरकार अनेक योजना राबावत आहे. तरीही अनेक प्रकारच्या अडचणी आणि त्या योजनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या त्रुटींमुळे या योजनांचे अजून चांगल्या प्रकारचे पूर्ण परिणाम आदिवासी क्षेत्रात दिसून येत नाहीत. त्यावर काही उपाययोजना खालीलप्रमाणे सांगितली आहे.

1) प्रत्येक आदिवासी क्षेत्रात वेगवेगळी भाषा बोलत असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणात अडचण निर्माण होते. त्यामुळे स्थानिक भाषेत शिक्षण देण्यासाठी सरकारने प्रयत्न करावे.
2) शिक्षकांचे वेळोवेळी मूल्यांकन करून त्यांना डिजिटल शिक्षणाचे प्रशिक्षण देण्यात यावे. त्यामुळे शिक्षणची गुणवत्ता सुधारण्यात मदत होईल.
3) मुलींसाठी सुरक्षित वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्यात यावी.
4) शाळा, महाविद्यालयात मुलींसाठी सुरक्षित स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्यात यावे.
5) विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती ही वेळेवर त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी.
6) आदिवासी क्षेत्रात डिजिटल शिक्षण आणि इंटरनेट सुविधांचा अभाव असल्यामुळे त्या वाढवण्यात याव्यात.
7) आदिवासी क्षेत्रात सरकारने शिक्षणाच्या बाबतीत जनजागृती कार्यक्रम मोठ्या प्रमाणात घेण्यात यावेत.
8) सरकार राबावत असलेल्या योजनांचे योग्य नियोजन केले पाहिजे. त्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली पाहिजे आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन त्याच्या आधारे धोरणे राबविले पाहिजेत.

**संदर्भसुची :**


1) भारत सरकार. 'आदिवासी कार्य मंत्रालय: वार्षिक अहवाल 2023-24' भारत सरकार, नवी दिल्ली, 2024.
2) महाराष्ट्र शासन. 'आदिवासी शिक्षण योजना: धोरण व अंमलबाजवणी' आदिवासी विकास विभाग, मुंबई, 2022.
3) निती आयोग. 'भारतातील आदिवासी शिक्षणाची स्थिती' भारत सरकार, नवी दिल्ली, 2021.
4) महाराष्ट्र शासन. 'आश्रमशाळा व एकलव्य मॉडेल निवासी शाळांचा आढावा अहवाल' आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, 2020.
5) महाराष्ट्र शासन. 'महाराष्ट्रातील आदिवासी शिक्षण: वास्तव व आव्हाने' आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, 2019.
6) देशपांडे, आशा. 'भारतातील आदिवासी शिक्षण : समस्या व संधी' इकोनॉमिक्स अँड पॉलिटिकल विकली (मराठी अनुवाद), नवी दिल्ली, 2019.
7) शिंदे, पी. आर. 'शिक्षण आणि सामाजिक बदल : आदिवासी समाजाचा अभ्यास' हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई, 2022.
8) काळे, एस. एन. 'आदिवासी महिलांचे सक्षमीकरण आणि शिक्षण' मराठवाडा विद्यापीठ प्रकाशन, औरंगाबाद, 2020.
9) जाधव, व्ही. बी. 'आदिवासी समाजातील सामाजिक परिवर्तन' विद्या प्रकाशन, नागपूर, 2017.
10) पाटील, आर. के. 'आदिवासी समाज आणि शिक्षण: एक समाजशास्त्रीय अभ्यास' डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2018.